# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०२०

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक १ ते ११ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री** :

(क) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा (१) सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक तांत्रिक निरीक्षण अहवाल (स्थानिक संस्था) (२) सन २०१८-२०१९ या वर्षाचा विनियोजन लेखा (३) वित्तीय लेखा खंड – एक व दोन (४) राज्य वित्त व्यवस्थेवरील लेखापरीक्षा अहवाल (५) आर्थिक व महसूल क्षेत्रावर अहवाल (६) सामान्य आणि सामाजिक क्षेत्र व सार्वजनिक उपक्रमांवरील अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व आदिवासी विकास विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च, २०२० या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **महसूल मंत्री** :

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **महसूल व वन विभागाचा** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह)

विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(४) संसदीय कार्य मंत्री** : (क) विधानसभेच्या सन २०२० च्या दुसऱ्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० ते दिनांक १४ मार्च, २०२० या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण २९९ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ८९ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **संसदीय कार्य विभागाचा** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : उप मुख्यमंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**चार : सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.**

(१) गृह विभाग.

(२) महसूल व वन विभाग.

(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

(४) नगरविकास विभाग.

(५) वित्त विभाग.

(६) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

(७) ग्रामविकास विभाग.

(८) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

(९) नियोजन विभाग.

(१०) सार्वजनिक आरोग्य विभाग.

(११) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग.

(१२) आदिवासी विकास विभाग.

(१३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

(१४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[चर्चारोध (गिलोटीन) दुपारी ०३.०० वाजता]**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२०.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(२) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(३) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(५)** (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(७) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व**

**नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(८) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(९) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(१०) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० — महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२०.**

---

**(११)** (क) **सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२०.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२०

## " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ सप्टेंबर, २०२०

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा